**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १३ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **ईशान्येकडची राज्य देशाच्या विकासाचं इंजिन बनत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन/ मिझोरम दौऱ्यात केलं ९ हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन.**
2. **अनुकंपा तत्वावरील १५ वर्षांपासून नियुक्ती रखडलेल्या सर्वांनाच लवकर नियुक्ती देणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची यवतमाळ मध्ये घोषणा.**
3. **नागपूरहून लवकरच भारताची पहिली फ्लॅश चार्ज इलेक्ट्रिक बस सुरू होणार: केंद्रीय मंत्री नितीन गडकरी.**
4. **संपूर्ण विदर्भात येत्या सोमवार पर्यंत वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट.**

---

पंतप्रधान नरेंद्र मोदी/मिझोरम

भारत जगातली सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे आणि ईशान्येकडची राज्ये देशाच्या विकासाचं इंजिन बनत आहेत. सरकारचं ॲक्ट इस्ट धोरण आणि ईशान्येच्या आर्थिक कॉरिडॉर योजनेत मिझोरामचं महत्त्वाचं योगदान आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मिझोरामची राजधानी आयझॉल इथल्या नऊ हजार कोटी रुपयांहून अधिकच्या विविध विकास योजनांचं आज पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं भूमिपूजन आणि उद्घाटन झालं. त्यावेळी ते बोलत होते. या योजना रेल्वे, रस्ते, ऊर्जा आणि खेळांसह विविध क्षेत्रांशी संबंधित आहेत. आठ हजार कोटी रुपये खर्चाच्या बैराबी-सैरांग या नव्या रेल्वे मार्गाचं पंतप्रधानांनी उद्घाटन केलं. या रेल्वेमार्गामुळं आयझॉल भारतीय रेल्वेच्या जाळ्याशी जोडला जाणार आहे. मिझोराममधलं सैरांग पहिल्यांदाच राजधानी एक्स्प्रेसच्या माध्यमातून थेट दिल्लीशी जोडला जाणार आहे. यामुळे मिझोरामचे शेतकरी आणि व्यापारी देशातल्या अधिकाधिक बाजारपेठां पर्यंत पोहोचतील आणि रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला.....

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी -१३ सेकंद)***

***This is not just a railway connection, but it is a lifeline of transformation. It will revolutionize the lives and livelihoods of the people of Mizoram.***

बोगदे आणि ५५ मोठे पूल असणारा हा रेल्वेमार्ग तयार करणं आव्हानात्मक होतं, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमात म्हणाले.

---------------------------------------------

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अनुकंपा तत्त्वावरील १५ वर्षांपासून नियुक्ती रखडलेल्या सर्वांनाच लवकर नियुक्ती देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत यवतमाळ इथं आज आदी कर्मयोगी अभियान आणि जिल्ह्यातील २८९ कोटींच्या प्रकल्पाचं लोकार्पण तसंच लाभ वितरण सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसंच मंत्री संजय राठोड उपस्थित होते. अनुकंपा तत्वावरील एकही अर्ज शिल्लक राहणार नाही अशी व्यवस्था तयार केल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. डिसेंबर २०२६ पर्यंत यवतमाळ जिल्ह्यातल्या शंभर टक्के शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मिळेल असा विश्वासही त्यांनी यावेळी दिला. यवतमाळ जिल्ह्यात अतीवृष्टीमुळं नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करु असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

---------------------------------------------

ॲड.आशिष शेलार

ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या महाराष्ट्रातील बारव आणि विहीरींचे जिल्हा निहाय सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी आज जाहीर केले.आज सांस्कृतिक विभागातर्फे तज्ञांसोबत सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी बैठक घेऊन बारव संवर्धन, संरक्षण याबाबत आढावा घेतला.याबाबत सविस्तर माहिती देताना त्यांनी सांगितले की, प्राथमिक माहिती जी समोर आली आहे त्यामध्ये राज्यात ऐतिहासिक वारसा असलेल्या आणि पुराणकाळापासून ज्यांच्या नोंदी सापडतात अशा ३,००० च्या वर बारव आहेत.

---------------------------------------------

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी/फ्लॅश-चार्जिंग इलेक्ट्रिक बस

एक काळ असा होता जेव्हा नागपूर आणि विदर्भातील इतर प्रदेश मागासलेले मानले जात होते. मात्र आता अत्याधुनिक पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमुळे शहरात जागतिक केंद्र बनण्याची क्षमता आहे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी नागपूरमध्ये सांगितले. गडकरी यांनी नागपूर-अमरावती महामार्गा वरील 2.85 किमी लांबीचा नवीन 4-लेन ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार उड्डाणपुलाचे उद्घाटन काल केले. हा पूल 191 कोटी रुपये खर्चाने तयार करण्यात आला आहे. हा उड्डाणपूल अमरावती रोडवरील भोले पेट्रोल पंप चौकाला नागपूर विद्यापीठ कॅम्पस चौकाशी जोडतो, ज्यामुळे वाहतूक कोंडी कमी होईल आणि प्रवासाचा वेळ वाचेल. एका महत्त्वाच्या आगामी प्रकल्पावर प्रकाश टाकताना गडकरी यांनी घोषणा केली की, देशातील 135 प्रवाशांची आसनक्षमता असलेली पहिली फ्लॅश-चार्जिंग इलेक्ट्रिक एसी सार्वजनिक बस लवकरच नागपुरात प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली जाईल.

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी 22 सेकंद)***

***आणि त्याचबरोबरचा तिकीट रेट डिझेल बसपेक्षा 30 टक्के कमी आहे आणि भारतातील अशी पहिली बस आता नागपुरला सुरू होण्याचा मार्ग देखील मोकळा झालेला आहे आणि एकदा पायलट मध्ये झालं की, 'कामठी टू वाडी' या पलीकडे आपण गोंडखैरीपर्यंत सगळ्या मोठ्या रोडवर ही बस चालवून नागपूरच्या पब्लिक ट्रांसपोर्टमध्ये पण मोठ्या प्रमाणात सुधार होणार आहे.***

यावेळी उपस्थित असलेले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी पायाभूत सुविधांच्या उपक्रमांबद्दल माहिती दिली आणि काटोल येथे राज्याचा सर्वात मोठा संत्रा प्रक्रिया फूड पार्क उभारण्याची घोषणा केली.

**-------------------------------------------**

हवामान

हवामान! विदर्भातील अमरावती अकोला बुलढाणा यवतमाळ चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. आज नागपुरात देखील अधून मधून ढगाळ वातावरण असून संध्याकाळच्या सुमारास मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली. दरम्यान येत्या काही तासात विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, गडचिरोली, वाशिम, वर्धा, नागपूर, बुलढाणा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

---

पुणे-अमरावती-पुणे/विशेष रेल्वेगाडी

पुणे - अमरावती - पुणे ही साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सुरु करण्यात येणार आहे. दौंड, अहमदनगर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, मलकापूर, शेगाव, अकोला, भुसावळ, मुर्तिजापूर आणि बडनेरा या स्थानकावर विशेष रेल्वेचे थांबे असतील. सात ऑक्टोबरपासून २६ नोव्हेंबरपर्यंत या विशेष रेल्वेच्या फेऱ्या होणार आहेत. याकाळात प्रत्येक मंगळवारी पुण्याहून सायंकाळी सात वाजून ५५ मिनिटांनी ही गाडी सुटेल आणि अमरावतीला दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजून पाच मिनिटांनी पोहोचेल. तर, प्रत्येक बुधवारी अमरावती इथून दुपारी बारा वाजता सुटून पुणे इथं दुसऱ्या दिवशी रात्री सव्वाबारा वाजता ही गाडी पोहोचेल.

---

स्थलांतर

अमरावतीच्या मेळघाट वनक्षेत्रात नागरिकांवर सातत्याने हल्ले करणाऱ्या त्या नरभक्षक वाघाच्या स्थलांतराचा निर्णय अखेर घेण्यात आला आहे. काल १२ सप्टेंबर रोजी वनमंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आमदार रवी राणा, आमदार केवलराम काळे, यशवंत काळे, शैलेश म्हाला यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना तत्काळ अनुकंपा तत्वावर शासन सेवेत घेण्याचे निर्देश मंत्री गणेश नाईक यांनी दिले.

---

इरई धरण

मागील काही दिवसांपासून चंद्रपूर जिल्ह्यात आणि इरई धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. त्यामुळे इरई धरण ९९ टक्के भरले आहे. त्यामुळे काल सायंकाळ पासून धरणाचे ७ दरवाजे १ मीटर पर्यंत उघडण्यात आल्याने लगतच्या वर्धा नदीच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ईरई धरण आणि वर्धा नदी लगतच्या गावांना प्रशासनाच्या वतीने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

---

आशिया चषक

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये उद्या 14 सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजता भारत आणि पाकिस्तान दरम्यान आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेट सामना होणार आहे.

---

सोयाबीनची पहिली आवक

अमरावती जिल्ह्यात यंदाच्या हंगामातील नव्या सोयाबीनची पहिली आवक काल अंजनगाव सुर्जी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत झाली. व्यापाऱ्यांनी सोयाबीन ₹४७५१ प्रति क्विंटल या दराने खरेदी केली. दराच्या बाबतीत शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

---

महात्मा गांधी इन्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी वर्धा येथूनच देशाला स्वच्छता आणि आरोग्य सेवेचा मुलमंत्र दिला. त्यांच्या या मुलमंत्राचा स्विकार करत वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील नागरिकांना मानवतेच्या भावनेतून चांगल्या आरोग्य सेवा देण्याचे कार्य करावे, असे प्रतिपादन वर्ध्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. सेवाग्राम येथे महात्मा गांधी इन्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्सचा स्थापन दिवस आणि पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भोयर यांच्या हस्ते एमबीबीएसच्या विविध अभ्यासक्रमाच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पदवी पदक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच रुग्णालयात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नर्स आणि कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

---